CMYK




दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २९० | मंगळवार, दि. १५ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ०६

**उद्या अंक नाही**

आज दि.१५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त दै.लक्ष महाराष्ट्र कार्यालयास सुटी असेल्याने उद्या दि.१६ ऑगस्ट २०२३ चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते बांधवांनी नोंद घ्यावी.

-संपादक

## न्यूज कॉलम

### मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण

धुळे । भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ७६ वा वर्धापन दिन सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात साजरा करण्यात येणार आहे. राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या पत्नी व वीरमाता, वीरपिता, शौर्य पुरस्कारविजेते, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, माध्यम प्रतिनिधी, इतर मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहावे.

### कंटेनरला मालट्रकची धडक, चालकाचा मृत्यू

धुळे । मुंबई-आग्रा महामार्ग क्र.३ वरील सेंधवा ते शिरपूर रस्त्यावर असलेल्या बिजासन पोलीस चौकीच्या पुढे दुभाजकावर धडकलेल्या कंटेनरला भरधाव वेगातील आलेल्या मालट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात कंटनेरमधील चालक गंभीर जखमी होवून मरण पावल्याची घटना सुमारास घडली. फिर्यादीवरून शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात मालट्रक चालकावर गुन्हाची नोंद करण्यात आली आहे. तपास पोहेकॉ.उदय पवार करीत आहेत

# एक दिवसाआड पाणी देण्याबाबत लेखी आश्वासन द्या!
# अन्यथा जनआक्रोश मोर्चा काढणार : आ. शाहंचा इशारा

धुळे । प्रतिनिधी

धुळेकरांना एक दिवसाआड पाणी मिळेल, असे लेखी आश्वासन १७ ऑगस्टपर्यंत द्यावे, अन्यथा २८ सप्टेंबर रोजी महापालिका प्रशासनाच्या विरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा काढून प्रशासनाला काम करण्यास भाग पाडले जाईल, असा परखड इशारा आमदार फारुख शाह यांनी आज मनपा अधिकार्यांना दिला.

महानगरपालिकेने आठ दिवस इतर सर्व कामे बंद करून फक्त पाणी वितरण व्यवस्था सक्षम करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. शहरातील पाणी पुरवठासंदर्भात आ.फारुख शाह यांनी आपल्या दालनात मनपा, मजिप्रा व वीज अधिकार्यांची संयुक्त बैठक बोलवली होती. त्यावेळी त्यांनी पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती जाणून घेतानाच पाणीप्रश्नी अधिकार्यांना धारेवर धरले. तसेच मनपातील सत्ताधार्यांवरही आसुड ओढले. बैठकीस धुळे महानगरपालिकेचे देविदास टेकाळे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे दिलीप पाटील, वीज वितरण कंपनीचे श्री.पवार, मनपा अभियंता कैलास शिंदे, सहाय्यक अभियंता चंद्रकांत उगले, नरेंद्र बागुल आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ.शाह म्हणाले की, धुळेकरांना एक दिवसाआड पाणी देण्याबाबत केवळ आश्वासने दिली जात आहेत. गेल्यावेळी मी आंदोलन केले. त्यानंतर पाणीपुरवठा १० दिवसांवरुन सहा-सात दिवसाआड करण्यात आला. सत्ताधार्यांचा अधिकार्यांवर वचक राहीलेला नाही. योग्य नियोजन केल्यास दोन दिवसाआड पाणी देता येणे शक्य आहे. परंतु, पदाधिकार्यांना जनतेच्या प्रश्नांशी काहीएक देणे-घेणे नाही. त्यामुळे धुळेकर दिवसाआड पाण्यापासून वंचित आहेत. परंतु, कोणत्याही परिस्थितीत धुळेकरांना एक दिवसाआड पाणी मिळालेच पाहीजे. यासाठी मी सर्व मार्गांचा अवलंब करणार असल्याचेही आ.शाह यांनी बजावून सांगितले.

यावेळी आयुक्त देविदास टेकाळे यांनी अशोक नगर जलकुंभ व नादुरुस्त व्हॉल्वसाठी २ कोटींच्या निधीची मागणी केली. त्यावर आ.शाह यांनी शासनाकडून दोन कोटी रुपये उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले. तसेच २५ सप्टेंबरपर्यंत अक्कलपाडा येथील ३३ केव्ही सबस्टेशनचे काम पूर्ण करण्याची सूचना केली. तर दि.१७ ऑगस्ट रोजी ३३ केव्ही सबस्टेशन व अक्कलपाडा योजनेची नेमकी स्थिती जाणून घेण्यासाठी पाहणी दौरा आयोजित केला असून या दौर्यात महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि वीज वितरण कंपनीचे अधिकारी सहभागी असतील. या पहाणी दौर्यात एक दिवसाआड पाणी पुरवठ्याचे लेखी आश्वासन न दिल्यास २८ सप्टेंबर रोजी भव्य जनआक्रोश मोर्चा काढून प्राशसनाला काम करण्यास भाग पाडू, पाणी पुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत आपला लढा सुरुच राहिल, असा इशाराही आ.शाह यांनी यावेळी दिला. आधी गळती व नादुरुस्त व्हॉल्व दुरुस्त करा, मग जनतेला आश्वासन द्या, पाण्यासाठी जो काही निधी लागेल त्यासाठी मदत करायला तयार आहे, पण धुळेकर नागरिकांना पाणी द्या, अशा सूचनाही आ.शाह यांनी आयुक्तांना केल्या.



### भाजपची भावना चांगली नाही!

**स्वा.सावरकरांचा उदोउदो करणार्या भाजपाची भावना चांगली नाही. शहरातील स्वा.सावरकर स्मारकाच्या सुशोभिकरणासाठी मी आमदार निधीतून २० लाखांचा निधी दिला. परंतु, मनपाने मुद्दाम नाहरकतचे इस्टीमेट अडवून ठेवले आहे. सदर काम होऊ नये यासाठी सत्ताधार्यांनी प्रशासनावर दबाव टाकला आहे का, असा प्रश्नही आ.शाह यांनी यावेळी अधिकार्यांना उपस्थित केला.**

### नदी संवर्धनाचा प्रस्तावही अडविला!

**आ.शाह म्हणाले की, गेल्या चार वर्षांपासून पांझरा नदी संवर्धनासाठी, नदी बारमाही व्हावी यासाठी मी मंत्रालयात प्रस्ताव दाखल केला आहे. यामुळे शहराच्या सुशोभिकरणातही भर पडणार आहे. परंतु, माझे नाव होवू नये म्हणून खासदारांनी स्वतंत्र पीए ची नेमणूक मंत्रालयात केली, असा आरोपही आ.शाह यांनी यावेळी केला.**

### रस्त्याच्या निकृष्ट कामांविरोधात आवाज उठविणार!

**धुळे शहरात रस्त्यांची निकृष्ट कामे होत असल्याचे सांगतानाच आ.शाह यांनी याविरोधात आपण आवाज उठविणार असल्याचे सांगितले. आमचे बिल अदा करा, अन्यथा पालकमंत्र्यांकडे तक्रार करु, अशा धमक्या देवून महापालिकेतून बिले काढली जात असल्याचा आरोपही आ.शाह यांनी यावेळी केला. तसेच मी केलेल्या रस्त्यांच्या कामांची बिले अदा करण्यापुर्वी गुणवत्ता तपासावी, मगच ठेकेदाराला बिले अदा करावित, अशा सूचना दिल्या असल्याचेही आ.शाह म्हणाले.**

# धुळ्यात निघाली महाकाय तिरंगा रॅली



### तब्बल ११११ मीटर लांब तिरंगा ध्वज

धुळे । प्रतिनिधी

वंदे मातरम... भारत माता की जय... या घोषणांसह डीजेवरील देशभक्तीपर गितांच्या तालावर धुळे शहरात १ हजार १११ फुट तिरंगा ध्वजाची रॅली काढण्यात आली. या रॅलीमुळे शहरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. हिंदवी स्वराज्य संघटनेचे अनुप अग्रवाल यांच्या पुढाकारातून काढण्यात आलेल्या या भव्य रॅलीने संपूर्ण धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले होते.

अखंड भारत संकल्प दिनानिमित्त धुळे शहरात १ हजार १११ फुट तिरंगा रॅली काढण्यात आली. शहरातील अग्रसेन महाराज पुतळ्यापासून या रॅलीला सुरवात झाली. या रॅलीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह धुळेकर नागरिक, महिला तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी १ हजार १११ फुट तिरंगा ध्वजासह ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आग्रारोड मार्गे गांधी पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. या रॅलीदरम्यान देशक्तीपर जोरदार घोषणा देण्यात येत होत्या. तसेच डीजेवरील 'मेरी शान तिरंगा है....' यासारखी देशभक्तीपर गिते प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीची स्फूर्ती चेतवत होती. या रॅलीत खा.डॉ.सुभाष भामरे, महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा जयश्री अहिरराव, माजी महापौर प्रदीप कर्पे, हिंदवी स्वराज्य संघटनेचे अनुप अग्रवाल, उपमहापौर वैशाली वराडे, स्थायी समिती सभापती किरण कुलेवार, सभागृह नेत्या भारती माळी, महिला बाल कल्याण सभापती सारिका अग्रवाल, उपसभापती विमलबाई पाटील, मायादेवी परदेशी, कल्याणी अंपळकर, विजय पाच्छापूरकर, शितलकुमार नवले,अमोल मासुळे, सुबोध पाटील, अनिल नागमोते, भगवान गवळी, रोहित चांदोडे, विकी परदेशी, हिरामण गवळी, नरेश चौधरी, पंकज विंचू, अजय अग्रवाल आदी मान्यवरांसह सर्व पक्षीय पदाधिकारी तसेच शाळकरी विद्यार्थी- विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# साक्री शहरात निघाली १११ फूट तिरंगा रॅली



साक्री । प्रतिनिधी

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त १४ ऑगस्ट रोजी १११ फूट तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांच्या आव्हानानुसार आजादी का अमृत महोत्सवा अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम दि १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सदर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रांगणापासून रॅलीची सुरुवात होत साक्री शहरातील पोळा चौक, मेन रोड असे मार्गक्रमण करत शिवाजी वाचनालयाजवळ रॅलीचा समारोप झाला. प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी रॅलीला संबोधित करताना सांगितले की,भारताचे आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आपल्याला केलेल्या आव्हानानुसार 'सेल्फी विथ तिरंगा' या अभियानाचा भाग बनुन आपल्या तिरंग्या विषयीचे प्रेम जागृत करावे. हर घर तिरंगा या अभियानाचा भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरावर अभिमानपूर्वक तिरंगा फडकवावा असे देखील आव्हान त्यांनी प्रसंगी केले.

सदर रॅलीच्या आयोजना प्रसंगी पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, पर्यवेक्षक प्रा डी पी पाटील, शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन खा तडवी,विद्यार्थी विकास अधिकारी डॉ पंकज अहिरे, प्रदीप राठोड, डॉ चंद्रकांत कढरे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक रुंद व शिक्षकेतर कर्मचारी बांधव तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद साक्री शाखेचे पदाधिकाऱ्यांनी रॅलीच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# धुळे लोकसभेची जागा आम्ही जिंकू : प्रा. वसंत पुरके

धुळे । प्रतिनिधी

आगामी काळात होणार्या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षानेही तयारी सुरू केलेली आहे. या निवडणुकीसाठी धुळे लोकसभा मतदारसंघातून उमेदवारीसाठी धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील, जिल्हाध्यक्ष श्यामकांत सनेर, डॉ. तुषार शेवाळे यांची नावे आघाडीवर असून, अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील. दरम्यान, धुळे लोकसभेची जागा आम्ही जिंकू असा विश्वास माजी मंत्री तथा काँग्रेसचे निरीक्षक प्रा. वसंत पुरके यांनी येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

प्रा. पुरके म्हणाले, आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यात आली. उमेदवार कोणीही असला तरी धुळे लोकसभेची जागा काँग्रेस ताब्यात घेईल असे सांगत लोकसभेसाठी आमदार कुणाल पाटील, जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर आणि डॉ. तुषार शेवाळे यांची नावे आघाडीवर आहेत. अजून कोणाच्याही नावावर शिक्कामोर्तब झालेला नाही. लवकर उमेदवार दिल्यास कामाला सुरुवात केली जाईल. जे पदाधिकारी व कार्यकर्ते पक्ष सोडून दुसरीकडे गेले आहेत त्यांना शांताबाईची उपमा देत खिल्ली उडविण्यात आली. ते पुन्हा पक्षात आल्यास त्यांचे स्वागत असेल असे सांगत त्यांना मात्र पारखूनच घेऊ असेही ते म्हणाले. इव्हीएम मशीनला आमचा शंभर टक्के विरोध आहे. बुथनिहाय कार्यकर्त्यांचे सुरू असलेलेकाम समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माजी मंत्री शोभा बच्छाव, जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, शहर जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल भामरे, युवराज करनकाळ, माजी खासदार बापू चौरे, डॉ. तुषार शेवाळे, वसंत सूर्यवंशी, श्रीखंडे, मुजफ्फर हुसेन, साबिर शेख, पीतांबर महाले, प्रवीण पवार, महेंद्र देसले, नितीन देसले, दगा सोनवणे, महेंद्र भदाणे, नेवा पठाण, किशोर पाटील, रोहिदास वाघ, आनंदा पवार, निंबा वाघ, प्रमोद बोरसे, विजय पाटील, भगवान गर्दे उपस्थित होते.

# आरडी ग्रुपमुळे नाशिकच्या सौंदर्यात भर पालकमंत्री दादा भुसे यांचे प्रतिपादन

### आरडी सर्कल, जॉगिंग ट्रॅकसह विविध विकासकामांचे लोकार्पण

नाशिक । प्रतिनिधी

गोविंदनगर परिसर वेगाने विकसित होत असून आरडी ग्रुपतर्फे तयार करण्यात आलेले आरडी जॉगिंग ट्रॅक, आरडी सर्कल, आरडी कॉर्नर अशी विविध विकासकामे उपयुक्त ठरणार असून शहराच्या सौंदर्यात भर घालणारे ठरणार असल्याचे प्रतिपादन नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी केले.

आरडी ग्रुपतर्फे विविध विकासकामांचे लोकार्पण ना. भुसे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी आ. सीमा हिरे, मनपा प्रशासक तथा आयुक्त डॉ. अशोक करंजकर, शिवसेनेचे जिल्हाधक्ष अजय बोरस्ते, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे आरडी ग्रुपचे संचालक राहुल देशमुख, संचालिका अंजली देशमुख, शहर अभियंता शिवकुमार वंजारी आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी ना.भुसे म्हणाले की, शहराच्या विकासात उद्योगपतींनी सक्रिय सहभाग घ्यावा अशा आवाहनाला आरडी ग्रुपतर्फे सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत उत्तम दर्जे दार आणि सौंदर्यपूर्ण अशी विविध कामांची निर्मिती केली असल्याचे सांगितले.




आ. सीमा हिरे यांनी सांगितले की, केवळ आरडी ग्रुपतर्फे विकसित करण्यात आलेल्या या कामांमुळे गोविंदनगर, कर्मयोगीनगर परिसरातील नागरिकांनाच नव्हे तर संपूर्ण नाशिक शहरातील आकर्षणाचे केंद्र ठरणारे असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करतांना आरडी ग्रुपचे चेअरमन राहुल देशमुख यांनी सांगितले की, आरडी ग्रुपने आज आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली असली तरी नाशिक ही कर्मभूमी समजून शहराच्या नावलौकिकात भर पडेल अशा विविध विकास कामांची निर्मिती केली आहे. या कार्यक्रमास मनपा कार्यकारी अभियंता जितेंद्र पाटोळे, सचिन जाधव, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, उद्यान अधीक्षक विवेक भदाणे, विभागीय अधिकारी डॉ. मयूर पाटील आदींसह उद्योजक व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिन : खादीला बाजारात सुगीचे दिवस

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर खादीला महत्त्व आल्याचे दिसून आले. अनेकांनी खादी खरेदीकडे खादीचे झेंडे आणि स्टाइलिश कपडे खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. गेल्या काही वर्षांपासून खादीला मिळालेल्या मॉडर्न टचमुळे तरुणाईचा ओढा याकडे वाढला असून, पारंपरिक झब्बा आणि कुर्ता, जिन्स, मोदी शर्ट आणि बुशर्ट तरुणाईचे आकर्षण ठरत आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त खादी ग्रामोद्योग केंद्रामार्फत राष्ट्रध्वज तयार केले जातात. ध्वज खरेदीसाठी ॲडव्हान्स बुकिंग करण्यात आली होती. ध्वजाबरोबर तिरंगी बॅचलाही मागणी होत होती.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आतापासून बाजारपेठा देखील सजल्या होत्या. गतवर्षीच्या तुलनेत यंदा तिरंगा आणि खादीच्या कपड्यांना अधिक मागणी असल्याने कारागिरांनाही काम मिळाले. दुकानामध्ये झेंडे, टी शर्ट, दुपट्टा, कुर्तीबरोबर खादीचे कपडे विक्रीसाठी दाखल झाले होते. अनेकांचा खादीचे कपडे, वूलनचे जॅकेट, टी शर्ट घेण्याकडे कल आहे. अशातच पूर्वी केवळ शासकीय कार्यालये, सहकारी संस्था, शाळा-महाविद्यालये, काही निवडक वर्गातील आस्थापनांनाच राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी होती; मात्र आता देशातील प्रत्येक नागरिकाला राष्ट्रध्वज लावण्याची परवानगी दिल्यामुळे तिरंग्याच्या विक्रीतही वाढ झाली आहे. त्यामुळे तिरंग्याबरोबरच खादीचे कपडे, वुलनचे जॅकेट, खादीची टोपी यांना मागणी वाढल्याचे दिसून आले.

### खादीची लोकप्रियता

**१९४० च्या दशकात खादी राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते. त्यावेळी भारताने स्वदेशीचा नारा देऊन विदेशी वस्तूंवर बहिष्कार घालून खादी अस्मितेचा विषय मानला होता. आता इतक्या वर्षानंतरही खादीची लोकप्रियता कमी झाली नाही. भारतातच नाही तर विदेशातही खादीची लोकप्रियता वाढली आहे. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखल्या जाणार्या खादीला आता फॅशन डिझायनरनेही पहिली पसंती दिली आहे. पहिल्यांदा खादी केवळ कवी, लेखक आणि पत्रकार लोकांपुरतीच मर्यादीत होती. आता तसे राहीले नाही. आता रॅंपवर चालणारा उत्कृष्ट मॉडेलदेखील खादी पसंत करतो.**



**दोन पैसे कमावण्याची संधी- दोन वर्षांपासून कोरोनामुळे शाळा-महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताकदिन साजरा करता आलेला नाही. त्याचा फटका विक्रेत्यांना बसला होता; मात्र यंदा २६ जानेवारी रोजी शाळा सुरू असल्यामुळे विविध कार्यक्रमांची रूपरेषा आखली जात आहे**

### फॅशनेबल खादीची क्रेझ

**पूर्वी नेहरू शर्ट आणि पायजामा तरुणवर्गाच्या पसंतीस उतरत नव्हता. पण अलीकडे जिन्स, फॅशनेबल बुशर्ट, मोदी शर्ट, जॅकेट खरेदी केली जात आहे. खादीची यंदा लाखो रुपयांची उलाढाल झाली आहे. शहरातील खादीच्या दुकानांवर पुरुषांसह महिलांचीही खरेदीसाठी गर्दी दिसून येत आहे. तसेच राष्ट्रीय ध्वज खरेदी करण्यासाठी शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयातील कर्मचारी मोठ्या प्रमाणावर दिसत होते.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# धुळ्यात पिस्तुलचा धाक दाखवत तरुणाला लुटले

धुळे । प्रतिनिधी

वलवाडी शिवारातील मेडिकल व्यावसायिकाला लुटल्याचा प्रकार तिखी फाट्यावर घडला. रस्ता लुटीत मिरची पूड, पिस्तुलचा होणारा सर्रास वापर बघता नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

प्रशांत सुरेश साळुंके या मेडिकल व्यावसायिकाने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.१३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारात ते गरताड गावाच्या शिवारातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील चाळीसगाव ते धुळे रोडवरील तिखी फाट्याजवळून त्यांच्या होंडा युनिकॉर्न या दुचाकीने (एमएच ०६/ एव्ही ७९९३) जात होते. मागावुन येणार्या दुचाकीवरील तिघांपैकी मागे बसलेल्या इसमाने त्यांच्या उजव्या दंडावर धक्का मारीत त्यांना पाडले. जमिनीवर पडल्यावर त्याने त्याच्या हातातील पिस्तुलचा धाक दाखवित आठ हजारांची रोकड, पाच हजार रूपये किंमतीचा मोबाईल हिसकवला तसेच १५ हजार रूपये किंमतीची दुचाकी घेवून पसार झाले. या फिर्यादीवरून मोहाडी नगर पोलीस ठाण्यात तिघा चोरट्यांविरूध्द भादंवि कलम ३९२,३४ सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ प्रमाणे गुन्हाची नोंद करण्यात आली आहे.

## अविश्वास ठराव, काँग्रेसवर बूमरँग

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसदेच्या सभागृहात येऊन मणिपूरमध्ये झालेल्या घटनांवर बोलावे यासाठी काँग्रेस पक्षाने दिलेला मोदी सरकारच्या विरोधातला अविश्वासाचा ठराव काँग्रेसवरच बूमरँग झाला. पंतप्रधानांनी अविश्वास ठरावावरील तीन दिवस झालेल्या चर्चेला उत्तर देताना देशातील जनतेनेच काँग्रेस पक्षावरच अविश्वास दाखवला आहे, असे बाणेदार उत्तर दिले होते. काँग्रेस पक्षाने केंद्रात ६७ वर्षे सत्ता उपभोगली. या काळात देशसेवेपेक्षा पक्षाच्या नेत्यांनी आपली घरे भरली. भ्रष्टाचार, घोटाळे, घराणेशाही, कंपूशाही, अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण, देशाचे सरहद्दीवर संरक्षण करण्याकडे कमालीचे दुर्लक्ष अशा कारणांने काँग्रेसची कारकीर्द गाजली. देशात मोदी पर्व सुरू झाल्यापासून काँग्रेसला ग्रहण लागले. सत्ता गेल्यापासून काँग्रेस पक्ष खूप अस्वस्थ आहे. केंद्रातून मोदींना हटविल्याशिवाय आपण सत्तेवर येऊ शकत नाही, याची गांधी परिवाराला खात्री आहे. म्हणूनच सन २०१८ मध्ये काँग्रेसने मोदी सरकारच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणला होता आणि आता ऑगस्ट २०२३ मध्ये पुन्हा एकदा अविश्वासाचा ठराव आणला. काहीही झाले तरी मोदी बधत नाहीत, त्यांचा अजेंडा ते बदलत नाहीत, इंडिया नावाखाली सर्व विरोधी पक्षांची मोट बांधली तरी मोदी सरकारवर काहीही परिणाम होत नाही हेच अविश्वास ठरावावर झालेल्या चर्चेच्या वेळी दिसून आले. इंडिया बॅनरखाली विरोधी पक्षांनी मोदी सरकारच्या विरोधात कितीही मुठी आवळल्या तरी संसदेत आणि संसदेबाहेर काहीही फरक पडत नाही. तीन दिवस झालेल्या चर्चेला मोदींनी १३३ मिनिटे भाषण करून सडेतोड उत्तर दिले. देशाच्या पंतप्रधानांनी केलेल्या भाषणाचा हा एक विक्रम असावा. विरोधी पक्षांकडे सर्व मिळून खासदारांची संख्या १४१ होती आणि एनडीएच्या खासदारांची संख्या तीनशे तीस होती. मग कितीही सरकारविरोधात ओरडा केला, कितीही घोषणा दिल्या, कितीही बेलगाम आरोप केले तरी सरकारकडे भरभक्कम बहुमत आहे, त्यापुढे अविश्वासाच्या ठरावाचे वांगे होणार हे सर्वश्रुत होते. मग काँग्रेसने मोदी सरकारच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणला तरी कशाला ? सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिल्यामुळे राहुल गांधी खासदार म्हणून पुन्हा संसदेत आले. तीन महिन्यांनंतर आपला हिरो संसदेत आला म्हणून काँग्रेस पक्षाने त्यांचे स्वागत केले. राहुल सरकारवर तोफा डागणार असे वातावरण निर्माण करण्यात आले. अविश्वासाच्या ठरावावरील चर्चेला राहुल गांधी सुरुवात करणार असे सर्व पक्षांनी गृहीत धरले होते. पण काँग्रेसने आघाडीचा फलंदाज म्हणून गौरव गोगई यांच्याकडे जबाबदारी सोपवली. म्हणे काँग्रेसची ही रणनीती होती. मग दुसऱ्या दिवशी राहुल गांधी यांनी मोठे आवेशपूर्ण भाषण केले. भारत जोडो यात्रेनंतर आणि गुजरातमधील न्यायालयांनी राहुल यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर राहुल बंदलले असतील.अनेकांना वाटले पण त्यांच्यातला बालीशपणा व थिल्लरपणा गेलेला नाही. अजूनही ते राजघराण्यातील युवराजाच्या भूमिकेतूनच वावरत असतात. ते मणिपूरला जाऊन आल्यामुळे तेथील परिस्थिती मोदींपेक्षा आपल्याला जास्त समजते अशा आविर्भावात बोलत होते. मोदी सरकारशी तुलना त्यांनी धृतराष्ट्र आणि रावणाशी केली. मोदी सरकारने भारत मातेची हत्या केली, असे बेधडक आरोप केले. एवढेच नव्हे तर संसदेतील सत्ताधारी महिला खासदारांकडे बघून फ्लाईंग किस देण्यापर्यंत त्यांनी थिल्लरपणाचा कळस गाठला. संसदेत खासदारांच्या बेशिस्त वर्तवणुकीच्या यापूर्वी अनेक घटना घडल्या आहेत, पण महिला खासदारांकडे बघून त्यांना फ्लाईंग किस देणे असे कधी घडले नव्हते. राहुल गांधी हे काँग्रेसचे बॉस आहेत. त्यांच्या मातोश्री ते भाषण करीत असताना सभागृहात उपस्थित होत्या, मग त्यांच्या साक्षीने त्यांनी असे आक्षेपार्ह वर्तन का करावे? भाजपच्या बावीस महिला खासदारांनी त्यांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी लोकसभा अध्यक्षांकडे लेखी पत्र देऊन केली आहे. केंद्रीयमंत्री स्मृती इराणी यांनी तर राहुल यांच्या फ्लाईंग किसवर अत्यंत कडक शब्दांत सभागृहातच संताप प्रकट केला. पंतप्रधानांनी आपल्या सव्वादोन तासांच्या भाषणात काँग्रेससह विरोधी पक्षांचे पूर्ण वस्त्रहरण केले.

## साठ वर्षांपूर्वी मुंबईत राबविली 'ड्रीम मरोळ' संकल्पना

आमचं मत विकासाला असे म्हणत निवडणुका येतात आणि जातात. मग सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यात विकासासाठी संघर्ष सुरू होतात. सत्ताधारी विविध योजना आखतात, बजेटमध्ये तरतूद होते, योजनांच्या अंमलबजावणीला सुरुवात होते. तरी विकासाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत अपेक्षित प्रभावीपणे पोहोचत नाही आणि त्यानंतर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडायला सुरुवात होते. सामान्य माणूस भांबावून जातो. त्याला अपेक्षित असलेल्या सुधारणा त्याच्यापर्यंत पोहोचत नाहीत. सत्ताधारी योजना आखतात; परंतु सुधारणांची गती मात्र संथच राहाते, हे असे का होते?

सुधारणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करत असताना नियम व अटींचे कठोर पालन करावे लागते, नियम आणि अटींचे पालन करताना त्यामध्ये एक अडसर अदृष्य अडसर उभा असतो. हा अडसर आहे 'माणुसकीचा, माणुसकीच्या नावाखाली योजनांची अंमलबजावणी स्थगित होते. अगदी आपल्या दैनंदिन जीवनातील अनुभव सुद्धा हेच सांगतो, रस्त्यावरून चालताना पदपथावरून चालावे, या नियमाची आपण अंमलबजावणी करू शकत नाही, पदपथावर छोटे-छोटे व्यावसायिक सआपला व्यवसाय थाटून बसलेले असतात. पोटापाण्यासाठी गरीब व्यवसाय करतात म्हणून महापालिका अधिकारी त्यांना पदपथावरून हुसकावून लावू शकत नाहीत. एखाद्या अधिकाऱ्याने असा प्रयत्न केलाच तर त्याला 'बाहुबली' नेता आडवा येतो. त्याच्या कॉलरला पकडून त्याला 'माणुसकीची' शिकवण देतो. वेळप्रसंगी त्याला धक्काबुक्की आणि मारहाणीलाही सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत महापालिका अधिकारी नियम व अटी डावलून 'चिरीमिरी' स्वीकारून गरिबाला पदथावर व्यवसाय करण्यास परवानगी देतो. अर्थात त्याच्या पदपथावर व्यवसाय करण्याच्या बेकायदेशीर प्रकाराकडे दुर्लक्ष करतो.

सर्वांना समाधान देणाऱ्या मार्गाचा अवलंब करतो. सामान्य माणूस पदपथावरून सुरक्षितपणे चालण्याच्या हक्काला मुकतो. माणुसकीचा विजय होतो मात्र विकासाच्या मार्गात मोठा अडसरच निर्माण होतो. 'माणुसकी आणि विकास' दोन्ही समतोलपणे पुढे घेऊन जाण्यासाठी अभ्यासू नेत्यांची गरज आहे. अशा अभ्यासू नेत्यांना नेतृत्वाची धुरा सांभाळण्याची संधी सर्व राजकीय पक्ष देतील का? सामान्य मतदारांनी सुद्धा आता भावनेच्या आहारी न जाता सुबुद्धपणे आपला मतदानाचा हक्क बजावला तर विकासाची गंगा सामान्य माणसाच्या दारी पोहोचायला वेळ लागणार नाही.

व्यक्तिगत स्वार्थ आणि भ्रष्टाचार हा विकासाच्या मार्गातील आणखी एक मोठा अडसर. नेत्याची निवड करताना सामान्य माणूस त्याच्या श्रीमंतीचा विचार करतो, त्याच्या कर्तृत्वाचा विचार करतो, त्याच्या राजकीय खानदानीचा विचार करतो, मात्र त्याची बुद्धिमता, नि:स्वार्थ सेवाभावी वृत्ती आणि विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची पात्रता याच्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करतो. परिणामी भूलभुलैया निर्माण करणाऱ्या वाचाळवीरांची आम्ही नेतेपदी निवड करतो. आमची विकासाची गंगा वहाते मात्र ती नेत्याच्या दारात थबकते आणि हळुवारपणे सामान्य माणसाच्या दारात नेत्यांच्या सोयीनुसार वहाते. गेल्या साठ वर्षांच्या कालावधीत मिठी नदीच्या 'मरोळगांव' या



गावाचा विकासाकडून अधोगतीकडे प्रवास सुरू आहे.

स्वच्छ, सुंदर निर्मळ, मिठी नदीच्या तीरावर साठ वर्षांपूर्वी मरोळ गावातील लोक सुखासमाधानाने राहात होती. मिठी नदीच्या दोन्ही तीरावर आंबा, काजू, चिकू, फणस, पपई अशा विविध फळांच्या बागा बहरल्या होत्या. या फळांनी आपल्या नावांचासुद्धा लोकांच्या मनात ठसा उमटविला होता. आंबावाडी, चिकूवाडी, काजूवाडी अशा फळांच्या नांवानी जागांची ओळख निर्माण केली होती. हिरवीगार शेती सुद्धा डुलत होती. शाळकरी मुले यथेच्छपणे मिठी नदीत डुबक्या मारायची.

पोर्तुगिजांनी या टुमदार गावावर आपला प्रभाव पाडायला सुरुवात केली होती. आदिवासी शेतकरी कुटुंबीयांनी त्यांच्या आमिषाला बळी पडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. सुशिक्षित ब्राह्मण कुटुंब सुद्धा या धर्मांतराच्या यात्रेत सहभागी झाली आणि मुंबईतले पहिले मोठं धर्मांतर सर्वप्रथम इथे संपन्न झाले. ख्रिस्ती धर्माची प्रार्थनास्थळे इथे उभी राहिली. हिन्दू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मिय मरोळ गांवात गुण्यागोविंदानी राहू लागली. चर्चबरोबरच मिशनऱ्यांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा उभ्या राहिल्या. पेहराव, सण, आचार-विचारात फरक पडला. मात्र सर्वधर्मिय गुण्यागोविंदाने आणि एकमेकांविषयी आदर भावनेने राहात होती.

मिठी नदी ही मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. मिठी नदी विहार झोन परिसरात उगम पावते व दक्षिणेकडे, वांद्रे कुर्ला संकुलमधून वहाते आणि शेवटी माहीम येथे अरबी समुद्रात मिळते. मुंबई उपनगर जिल्ह्याची निर्मिती होण्यापूर्वी या भू-भागाचे नाव साष्टी बेटे होते. इसवी सन १७७१-७२ पर्यंत हा प्रदेश पोर्तुगीज अंमलाखालील गोवा राज्यात समाविष्ट होता. १७७१-७२ नंतर या प्रदेशावर ब्रिटिश साम्राज्याचा अधिकार आला. इसवी सन १९२० मध्ये साष्टी तालुक्याची दक्षिण साष्टी व उत्तर साष्टी अशा दोन तालुक्यात विभागणी करण्यात आली. ८४ गावे (वांद्रे ने दहिसर व कुलती मुलुंड) असलेल्या मुंबई उपनगर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. यावेळी ठाणे जिल्ह्यातील काही गांवे वगळून मुंबई उपनगर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. इसकी सन १९६२ मध्ये बोरिवली तालुक्यातील काही गांवे व दक्षिण साष्टी तालुक्यातील काही गावे वेगळी करून अंधेरी व कुर्ला तालुक्याची निर्मिती करण्यात आली. तेव्हापासून मुंबई उपनगर जिल्ह्यात अंधेरी, बोरिवली व कुर्ला असे तीन तालुके आहेत. १ डिसेंबर १९४० पासून मुंबई उपनगर जिल्हा अस्तित्वात आला.

सन १९६२ पर्यंत मरोळगावात शेती हा मुख्य व्यवसाय होता. मिठी नदीच्या स्वच्छ सुंदर पाण्यामुळे येथे शेती व्यवसाय चांगला बहरला होता. फळबागांच्या वाड्या फळा फुलांनी डवरल्या होत्या. जमीनदारांनी बंगलीवजा घरे बांधून सुखा-समाधानाने राहात होते. सन १९६२ पासून हा भाग 'औद्योगिक क्षेत्र' म्हणून जाहीर झाला आणि मरोळगांवचे गावपण दबक्या पावलांनी नाहीसे होत गेले. एम. आय. डी. सी. माध्यमातून औद्योगिक इमारती उभ्या राहू जागल्या. अनेक मोठे कारखाने आले. कारखानदारीचा विकास जितक्या गतीने झाला तितक्या गतीने सुधारणा मात्र झाल्या नाहीत. या सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य आखणी झाली नाही किंवा त्याची अंमलबजावणी कडव्या शिस्तीने झाली नाही. वेळेनुसार आलेल्या संधीचा फायदा उचलणारे राजकीय नेते आणि त्यांना साथ देणारे 'बाहुबली' यांनी सार्वजनिक सुधारणा घडवून आणण्यापेक्षा व्यक्तिगत फायद्याकडे लक्ष दिले आणि दुर्दैवाने महापालिका अधिकारी, तहसीलदार कार्यालतील अधिकारी, पोलीस अधिकारी या सर्वांनी राजकीय नेत्यांशी हातमिळवणी करून व्यक्तिगत स्वार्थ साधला. मात्र विकासाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचू दिली नाही. आता मात्र समाजातील सुशिक्षित वर्ग जागरूक झाला आहे, सामान्य लोकांना सुद्धा आपल्या गरजा लढा देऊन मिळवाव्या लागतील याची जाणीव झाली आहे. एकमेकांवर आरोप- प्रत्यारोप करणारे, लाथाळ्या झाडणाऱ्या तथाकथित नेत्यांपासून लांब राहून फक्त समाज सुधारणा घडविण्याची मनीषा बाळगणाऱ्यांनी एकजुटीने उभे राहून समाज- सुधारणा घडविणे ही काळाची गरज आहे.

मरोळगांवातील आबालवृद्ध स्त्री-पुरुष 'ड्रीम मरोळ' या नावाने आपल्या गावात सुधारणा घडवून आणण्यासाठी एकत्रित आले आहेत. प्लास्टिक पिशव्या स्वतः वापरायच्या नाहीत आणि दुकानदारांना विनंती करून त्यांनासुद्धा त्याचा वापर करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न या मंडळींनी सातत्याने सुरू ठेवला आहे. प्रत्येक हाऊसिंग सोसायटीमध्ये कापडी पिशव्या पुरवण्याचा उपक्रम राबवला जात आहे. या कार्यासाठी एकत्रित आलेल्या स्त्री-पुरुषामध्ये कुणीही नेते नाहीत, तर प्रत्येक व्यक्ती 'कार्यकर्ता' आहेत त्यामुळे सर्वजण उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत.

रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग आठवडाभर पडून राहतात. आता मात्र सोसायट्यांमधून सुशिक्षित नागरिक वरिष्ठ महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या कचऱ्याचे ढीग तत्काळ हटविण्यासाठी सक्रिय झाले आहेत. मोहोल्यातून कार्यकर्ते एकत्रितपणे आपले मोहल्ले स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. शालेय विद्यार्थी परीक्षा संपल्याने या मोहिमेत सक्रिय सहभागी होत आहेत. ही चळवळ आता प्रत्येक सोसायटी आणि घराघरातून सातत्याने सक्रिय राहिली पाहिजे. आतापर्यंत सुशिक्षित म्हणवणारे फक्त सल्लागाराची भूमिका पार पाडत होते. आता सर्व सुशिक्षित, निवृत्त अधिकारी, तरुण उद्योजक एकदिलाने, एकजुटीने स्वच्छता मोहिमेमध्ये आणि महापालिकेच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी 'ड्रीम मरोळ'च्या माध्यमातून सक्रिय झाले आहेत. मरोळ गावातील विकासाची गंगा सामान्यांपर्यंत पोहोचणे आता नक्कीच शक्य होईल असा विश्वास वाटतो.

**- निलन हरिश्चंद्र मुरंजन**

## खरोखरचे स्वातंत्र्य प्राप्त करा - परम संत राजिंदर सिंह जी महाराज

संपूर्ण भारतात १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जातो. इतर देशांमध्ये वेग-वेगळ्या दिनी स्वातंत्र्य दिन साजरा होतो. भौतिक अर्थाने स्वातंत्र्य म्हणजे एखादा देश जो दुसऱ्याच्या गुलामीतून ज्या दिवशी मुक्त होतो त्या दिवसाला स्वातंत्र्यदिन असं मानलं जातं. अध्यात्मिक दृष्टिकोनातून स्वातंत्र्याचा अर्थ आत्म्याची मुक्तता अशा अर्थाने घेतला जातो.



आपला आत्मा आपल्या अंतरातील प्रकाश, प्रेम तसंच शांतीने परिपूर्ण आहे. आपल्यातील हे खजिने मन, माया आणि भ्रम याच्याही पलीकडे दडलेले आहेत. आपले लक्ष आपल्या अंतरातील आत्म्याकडे न जाता भौतिक जगात गुंतलेलं आहे. आपण मनात निर्माण होणाऱ्या इच्छांमुळे आपल्या आत्म्यावर मन मायेचे पडदे वाढवत आहोत आणि यामुळेच आपल्यात काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची सतत वाढ होत राहते.

या सर्व अडचणींवर मात करून आपल्या आत्म्याची अनुभूती घेण्यासाठी आपल्याकडे कोणता मार्ग आहे का?

या करिता या भूतलावर सर्वत्र शोध घेण्याची आवश्यकता नाही. सौभाग्याने, युगानुयुगे संत-महात्मे आत्मज्ञानाच्या क्षेत्रात विकास करीत आलेले आहेत. आपल्या अंतरी ध्यान टिकवण्यात त्यांनी सफलता प्राप्त केली आहे. यालाच ध्यान, मौन प्रार्थना किंवा अंतर्मुख होणे असं म्हणतात. आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी ते म्हणतात - खरं स्वातंत्र्य तेव्हाच मिळतं जेव्हा आपण शांत अवस्थेत बसतो, डोळे मिटतो आणि आपलं लक्ष दिव्य चक्षूवर केंद्रित करून प्रभूच्या ज्योतीचा अनुभव घेतो. जर आपण आपल्या आत्म्यावर पडलेल्या मन-मायेच्या अनेक आवरणांना हटविण्यात सफल झालो तरच आपण आपल्या खऱ्या आत्मस्वरुपास पाहू शकू जो ज्योतीने प्रकाशमान आहे.

जेव्हा आपला आत्मा शरीर आणि मन यांच्या कैदेतून मुक्त होतो तेव्हा मुक्त झाल्यामुळे आनंदित होऊन उर्ध्व गतीस प्राप्त करतो. या भौतिक जगताच्या स्थान आणि काल यांच्या सीमेपलीकडे गेल्यावर आपल्या आत्म्याला अनंत अशा निजस्वरूपाची ओळख होते. या भौतिक जगाच्या पलीकडील अध्यात्मिक मंडलातील प्रसन्नता आणि आनंद याचा अनुभव करू लागतो.

ह्या अध्यात्मिक यात्रेचा प्रारंभ आंतरिक प्रकाशाचं दर्शन घेतल्याने तसेच आंतरिक नाद ऐकल्याने सुरू होतो. जितके जितके आपण यात गढून जाऊ तितके आपण शारीरिक जाणिवेच्या पलीकडे जातो. हळूहळू स्थुल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण मंडले पार करून सत्य लोकात निजधामी परत जातो. या ठिकाणी आपला आत्मा स्वतःचे मूलस्वरूप पाहू शकतो आणि आपण परमात्म्याचे अंश आहोत याचा अनुभव घेऊ शकतो. तेव्हा आपला आत्मा स्वतःचे स्त्रोत असलेल्या परमात्म्यात विलीन होतो. अपार प्रसन्नता, परमानंद आणि प्रभू प्रेमाने युक्त असा होतो.

## शब्दकोडे-१५०



आडवे शब्द

१. अतिशय कृपण ५. सत्त्व ७. शंकराचे आयुध ९. पृथ्वी ११. पलीकडे १२. दरवाजा १३. मुद्रणालय १४. वार्ता, खबर १६. बारा १९. अशक्त २०. मलीन २१. समंजस २५. श्रीमंत २७. किरीट २८. तळपायाचा कडक भाग ३०. वाद्य ३२. दुधाचा हा पदार्थ पंजाबी भाज्यात वापरतात ३४. मल्ल ३६. भावनाप्रधान ३८. खळगा ४०. फुलांचा गुच्छ ४१. विष्णूचे वाहन ४२. सावित्रीचा पती ४४. दडपण ४५. शरीरातून आरपार जाणारे किरण- यांच्याद्वारे वैद्यकीय तपासणी करतात ४६. चोप ४७. वाफेवर अन्न शिजवण्याचे पात्र ४८. विवाहितेच्या पतीचे घर ५०. रुढी ५१. शंकराचा स्वभाव ५२. जीवघेणा विळखा ५५. वीज ५६. घट्ट ५७. राज्यसुख ५८. लोणच्यातील आंबट फळ ५९. धीर, बळ, ताकद ६१. सावध ६२. साधना ६४. याच्यापेक्षा मोती जड नसावा! ६५. दोष, उणीव ६७. नित्य ६९. लग्नमुंजीचा गाजावाजा करणारी उपद्रवी प्रथा ७१. पूर्वी कधी न झालेले ७२. विष्णूचा एक अवतार ७४. चिन्ह ७६. अवाक्षर ७७. पदवी ७८. उद्यान ७९. सेतू ८०. भाकरीबरोबर हा मस्त! ८१. अग्नी ८२. घृत ८३. हजामत, मुंडण

उभे शब्द

१. दुर्दैवी २. नवरदेव ३. कैरीचे आंबटगोड तोंडीलावणे ४. माळजमीन ५. चहाचा पेला ६. ---- बाईंडर- तेंडुलकरांचे गाजलेले नाटक ८. पराक्रमी ९. रमलेला १०. समाविष्ट, मिळालेला १३. चांगले १४. तीर १५. कंजूष १७. बाळाचे अंगडे १८. ढळलेला १९. दुध २१. बरोबरी २२. निबर, राठ २३. वीज २४. उमलणारी कळी २५. तराजू २६. वाचा २९. चंचल लक्ष्मी ३०. सभ्य ३१. ताकद ३३. दात ३५. गाव ३६. कृश ३७. सूर्य ३९. दक्षता ४०. उडी ४३. राबता, शेतजमीन ४४. नोकर ४६. डोके ४८. निवृत्तीचे वय ४९. नाशवंत ५०. सूर्योदयाची वेळ ५१. बावळट ५३. तृण ५४. खोटे, भ्रामक ५६. खटला ५७. दानव ५८. कितीतरी ६०. कानातील अलंकार ६३. मारुतीचा पिता ६४. आप्त ६६. आंब्याची उंची जात

### शब्दकोडे १४९ चे उत्तर

आडवे उत्तर - १.गावभवानी ५.कमाई ८.सह ९.वनमाळी ११.गवगवा १२.वाचा १४.रज १५.सुळसुळाट १७.लय १८.पु.ल.देशपांडे २२.तीर २३.सुस्कारा २५.सुर २६.आवाज २७.वाढ २८.सराईत ३०.नवरी ३२.खेळ ३३.नभ ३४.गाभारा ३७.लीला ३८.सत्य ४०.रीतसर ४२.जीवन ४३.आळ ४४.सशक्त ४५.वासव ४७.ताठर ४९.रजक ५०.खजूर ५२.ऋण ५३.पसार ५५.बोरे ५६.जाग ५९.मका ६०.वाळू ६२.दीप ६४.तलवार ६७.जाळ ६८.खळगा ७०.रिक्त ७१.वीर ७३.मिथुन ७४.हाल ७५.वहाण ७६.गवई ७७.कीचक ७९.चाक ८०.यम ८२.याग ८३.ऊर ८४.विपरित ८५.गळ ८६.सारण

उभे उत्तर

१.गाढवापुढे वाचली गीता २.भला ३.नीव ४.नमाज ६.मावळती ७.वावटळ ८.सवालजवाब १०.नरडे ११.गळा १२अ.चाल १३.वंश १६.सुरसुरी १९.देर २०.पांढरा २१.मस्का २३.सुत २४.रानभरी २८.सळसळ २९.ईश ३१.मुका ३४.गारवा ३५.राजीव ३६.जनगणना ३९.बेशक ४१.तराजू ४३.आरसा ४४.सजग ४६.सगा ४८.ठपका ५०.खरेदी ५१.रजा ५४.रवाळ ५७.गत ५८.पावा ५९.मनमिळाऊ ६१.घोळ ६३.परणिय ६५.लढवय्या ६६.रवि ६७.जानकी ६८.बल ६९.गावकरी ७२.रणांगण ७४.हाक ७८.चर्या ७९.चाप ८१.मग ८२.यार

## असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**किती वर्णावी थोरवी ?**
**माझा शेतकरी राजा**
**गातो मरणाची ओवी**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**झाला जगण्याचा भार**
**कष्ट उपसे कृष्पक**
**तरी दुष्काळाचा मार !**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**शिरी कर्जाचा डोंगर**
**तरी सुरु ठेवायचा**
**श्रम कष्टाचा नांगर !**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**किती अतिरेकी स्फोट**
**निर्दोणांच्या दारी आले**
**क्रुर मरणाचे लोट !**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**नाच मिळे मोलभाव**
**अन्न पिकवी कृष्पक**
**लुटे व्यापाऱ्याची हाव !**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**स्वैराचाराचे तांडव**
**ज्याने पाळला कायदा**
**त्याचा मोडला मांडव !**

**असे स्वातंत्र्य-स्वातंत्र्य**
**नाही उरलीच लाज**
**सत्तेवरच्या सांडांचा**
**कोण जिरवील माज ?**

**भाऊ कास्तकारा ऊठ**
**तुला माय-भू ची आण**
**उर्मटांच्या टाळक्यात**
**टोला एकतेने हाण !**

**- डी.बी. जगत्पुरिया**
**मो.९८६०४८४८५३९८**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### स्वरयात्री बाबूजी कार्यक्रमाचे उद्या आयोजन

**नाशिक ।** कलांगण पुणे निर्मित, स्वरयात्री सुधीर फडके यांच्या संगीतावर आधारीत स्वरयात्री बाबूजी या कार्यक्रमाचे आयोजन उद्या बुधवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता गंगापूररोड येथील शंकराचार्य न्यास सभागृहात होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहें. सुधीर फडके यांनी स्वरबद्ध आणि संगीतबद्ध केलेल्या मराठीतील नामवंत कविंच्या अजरामर रचना कार्यक्रमाची निर्मिती, संकल्पना आणि गायन चैत्राली अभ्यंकर यांची आहे. शशांक दिवेकर आणि अमित दाते हे गायक कलाकार सहभागी होणार आहेत. त्यांना तुषार दीक्षित, प्रसन्न बाम, आदित्य कुलकर्णी, ऋतुराज कोरे साथसंगत करणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदन अक्षय वाटवे करणार आहे. तरी या कार्यक्रमांस रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन गोल्डन मेमरीजच्या चैत्राली अभ्यंकर यांनी केले आहे.

# विचारवंत प्रा. नरके यांच्या श्रद्धांजली सभेत मंत्री भुजबळांना अश्रू अनावर

## प्रा. नरके यांच्या नावाने मेट भुजबळ नॉलेज सिटीत भव्य ग्रंथालय

**शोकसभेत विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून भावपूर्ण श्रद्धांजली**



**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ विचारवंत साहित्यिक प्रा.हरी नरके यांच्या निधनाने माझा वैचारिक आधारस्तंभ हरपला असल्याच्या शोकभावना व्यक्त करतांना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांना अश्रू अनावर झाले. यावेळी 'हरी तुला आम्ही तुला मरू देणार नाही, तू सुरु केलेलं काम आम्ही नेटाने पुढे नेऊ' अशा शोकसंवेदना त्यांनी व्यक्त केल्या.

ज्येष्ठ विचारवंत प्रा.हरी नरके यांचे दि.९ ऑगस्ट रोजी दुःखद झाले. त्यांच्या निधनामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी समता परिषदेच्या वतीने मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, भुजबळ नॉलेज सिटी, बांद्रा मुंबई येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, पत्रकारिता, कला आदी क्षेत्र यांसह सर्वपक्षीय राजकीय मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी प्रा.हरी नरके यांच्या पत्नी संगीता, मुलगी प्रमिती व नरके कुटुंबीय, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार पंकज भुजबळ यांच्यासह संपूर्ण भुजबळ कुटुंबीय, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी हरीच्या खांद्यावर बसून जाण्याचे आमच वय होत. परंतु तो आमच्या खांद्यावर जाण्याची वेळ आली याचं मोठ दुःख आहे अशा भावना ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब कसबे यांनी उपस्थित न राहू शकल्याने ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्याकडून व्यक्त केल्या.प्रा. नरके यांच्या जाण्याने आमचा मार्गदर्शक हरपला अशा शोकभावना आमदार महादेव जानकर यांनी व्यक्त केल्या. यावेळी आ. सचिन अहिर, माजी आमदार तुकाराम बिडकर, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन वैद्य, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ज्येष्ठ सनदी अधिकारी भूषण गगराणी, ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे, प्रा.अर्जुन डांगळे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, सुनील सरदार, प्रा. शंकर बोऱ्हाडे, मुस्लीम ओबीसी संघाचे शब्बीर अन्सारी, डॉ.कैलास कमोद, पार्वतीताई शिरसाठ, डॉ. मिलिंद कसबे, प्रा.दिवाकर गमे, प्रा.कविता कर्डक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोकभावना व्यक्त करत आदरांजली व्यक्त केली.

# ऑनलाईन बेटिंग, जुगाराविरोधात आज मानवी साखळी

**जनसेवा सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळातर्फे जनजागृती मोहिम**

**नाशिक । प्रतिनिधी**



डिजिटलायझेशनच्या युगात ऑनलाइन पद्धतीने सर्व कामे सोपी झाली आहे. मात्र ऑनलाईन गेम, बेटिंग ॲप, ऑनलाईन जुगार यांमुळे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत. अनेक तरुण युवकांचे करिअर संपुष्टात येत असून, याविरोधात जनसेवा सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळातर्फे जनजागृती मोहिम हाती घेतली असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष प्रशांत पुरकर यांनी दिली आहे. मोहिमेअंतर्गत पंचवटी कारंजा येथे स्वातंत्र्य दिनी आज (दि.१५ ऑगस्ट) रोजी सकाळी ११ वाजता मानवी साखळीचे आयोजन केले असून नाशिककरांनी सहभागी होण्याचे आवाहन पुरकर यांनी केले आहे.

यासंदर्भात प्रशांत पुरकर म्हणाले, ऑनलाईन गेम, बेटिंगच्या मोठमोठ्या जाहिराती बघून त्यात अनेक जण वाहावत जाता असून शेवटी केवळ अंधारच उरत असल्याने कुटुंबातील कर्त्या पुरुषाला नाकर्ते पणाला सामोरे जावे लागते आहे. संबंधितासह त्याच्या संपूर्ण कुटुंबाची वाताहत या गेमिंगमुळे होते आहे.

आज टीव्ही चॅनेल तसेच मोबाईलवर चालणाऱ्या, भुरळ पाडणाऱ्या आणि एखाद्या क्रिकेटर आणि मोठ्या सेलिब्रेटीने केलेल्या जाहिरातींना अनेक जण बळी पडतात. जाहिरातीतील व्यक्तींना आपण आदर्श मानत असल्याने त्यांच्या मागे वाहवत जातो. या गेमिंगच्या दृष्टचक्रात अडकतो. ही गंभीर बाब असून, अशा प्रकारच्या जाहिरातींवर सरकारने बंदी घातली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. या विषयासंदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'जनसेवा सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ' पंचवटीमार्फत निःस्वार्थ जनजागृती मोहिम राबवतो आहोत. सोन्यासारखे आयुष्य या ऑनलाइन गेमिंगच्या नादा वाया घालवू नये, अशी भूमिका घेऊन आम्ही सर्वसामान्यांना जागृक करीत आहे.

संस्थेतर्फे पंचवटी कारंजा येथे आज स्वातंत्र्य दिनी सकाळी ११ वाजता मानवी साखळीचे आयोजन केले आहे. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत पुरकर, राजेश आहेर, केतन थोरात, प्रितीश संचेती, संकेत वारे, राहुल ब्राम्हणकर, पवन जोशी, राजुभाई ठक्कर, श्रीपाद सूर्यवंशी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, इतर सामजिक संस्थांचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक व इतर अनेक सर्व सामान्य नागरिक उपस्थित राहणार आहेत. नाशिककरांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## 'जश्न आजादी का' या देशभक्तीपर हिंदी गीतांचा आज कार्यक्रम

**नाशिक ।** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अफलातून म्युझिक लव्हर्सतर्फे आज सोमवारी दि. १५ ऑगस्ट रोजी 'जश्न आजादी का' या देशभक्तीपर हिंदी गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन इंदिरानगरच्या स्वर्णिमा हॉल येथे संध्याकाळी ६ वाजता विनामूल्य करण्यात आले आहे.

यात विविध गायक कलाकार गायन करणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना मयूर टूकडीया यांची आहे. निवेदन सचिन जाधव हे करणार आहेत. रसिक श्रोते व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांतर्फे हरीश ठक्कर व प्रकाश गोसावी यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्षपदी चेतन कासव

**नाशिक । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिंडोरी लोकसभा युवक जिल्हाध्यक्षपदी चेतन कासव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते मुंबईत या नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस व सर्व संबंधिताना तसेच सर्व वित्तीय संस्था स्थानिक स्वराज्य संस्था याना या जाहीर नोटीसीने कळण्यात येते की, मौजे नंगाव ता.जि धुळे येथिल ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३६२ त्यासी ऐकुण क्षेत्र ३० बाय ३० असे आहे. सदर प्लॉट बखळ आहे.वरील वर्णणांकीत मिळकत ही आज रोजी बखळ नाही त्यावर २३ बाय २६ चे पडक्या स्वरुपाचे पत्र्याचे बांधकाम केलेले आहे या मिळकतीच्या चर्तुसिमा खालील प्रमाणे-

पूर्व-आणा भिल याचे राहते घर व बखळ जागा
पश्चिम-रस्ता
दक्षिण- रस्ता
उत्तर - याच मिळकतीचा उर्वरीत भाग बखळ जागा

वरील वर्णणांकीत मिळकतीपैकी दक्षिणेकडील २३ बाय २६ चे क्षेत्र पडक्या स्वरुपाचे पत्र्याचे आमचे पक्षकार यानी सदर मिळकतीचे मालक व ताबेदार ईश्वर गोकुळ शिरसाड, संजय गोकुळ शिरसाड, सुनिता नामदेव मोरे, प्रभावती सुभाष वाघ, जयवताबाई गोकुळ शिरसाड याच्या सोबत वर नमुद आलेली मिळकत कायम खरेदीने विकत घेण्याच्या व्यवहार आमचे पक्षकार यानी केलेला आहे. सदर जाहीर नोटीस प्रकाशित करीत आहे.

तसेच सदर मिळकत ही कोणत्याही संस्थेकडे, बँकेकडे किवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रासह खालील पत्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ दिवसाचे आत प्रत्यक्ष येवुन भेट घ्यावी तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरची हरकत/नोटीस आमचे पक्षकार अशिलावर बंधनकारक राहणार नाही. मुदतीनंतर कुणाचीही हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहीतीवरून व सागणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनाक: १४/०८/२०२३

**अॅड.प्रविण दिलीपराव चौधरी**
एल एल.बी. ॲडव्होकेट
धुळे जिल्हा न्यायालय, धुळे.
मो. ८३२९३५१०७५

## हर्नियाचे प्रमाण महिलांपेक्षा पुरुषांमध्ये जास्त- डॉ. जोशी





**शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान**

**नाशिक । प्रतिनिधी**

हर्निया ही एक समस्या असून ज्यामध्ये पोटाचे स्नायू सदोष होतात. हर्निया सामान्यतः ओटीपोटात असतो. मात्र मांडीच्या वरच्या भागात, नाभी आणि कमरेच्या आसपास देखील होतो. हर्नियामध्ये पोटाचे स्नायू कमकुवत होऊ लागतात. हा आजार पुरुष आणि स्त्रिया दोघांमध्येही होतो. मात्र पुरुषांवर त्याचा सर्वाधिक परिणाम होत असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पीटलचे डॉ. दिनेश जोशी यांनी केले.

राजीवनगर येथील शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी डॉ. जोशी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष विजय भावे, उपाध्यक्ष वेदु सोनवणे, कार्यवाह सुरेश कांबळे, स्वाती बेलदार उपस्थित होते. डॉ. जोशी म्हणाले की, हर्निया रोगामुळे पोटाचे स्नायू कमकुवत होऊ लागतात आणि या कमकुवततेमुळे आतड्या बाहेर येतात. पुरुषांच्या कमरेच्या भागात हर्निया जास्त होतो. यामुळे आतड्याचा अवरोध होऊ शकतो त्यामुळे अधिक समस्या उद्भवतात. वेळीच तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन पुढील उपचार करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. सुरुवातीला संघाचे अध्यक्ष विजय भावे यांनी संघातर्फे राबविण्यात येणार्या कार्याची माहिती दिली.

## 'शिक्षणविश्व २०२३' मधून नामवंत व्याख्यात्यांना ऐकण्याची संधी

**कॉलेजरोड, गंगापूररोड वाणी मित्र मंडळाचा उपक्रम**









**नाशिक । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या प्रगतीला अजून गती मिळण्यासाठी करिअर विषय निवड, यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली युपीएससी, एमपीएससी, एनडीए सारख्या विविध स्पर्धा परिक्षांमधील होत असलेल्या संधी तसेच विद्यार्थ्यांचे ध्येय, उद्दीष्ट व आत्मविश्वास वाढीसाठी उच्च दर्जाचे नामवंत व्याख्यातांचे मार्गदर्शन 'शिक्षणविश्व २०२२' च्या माध्यमातून मंगळवार दि. १५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता मिळणार आहे.

मविप्र इंजिनिअरिंग कॉलेज, आकाशवाणी टॉवर जवळ, होरायझन स्कुल समोर, गंगापूर रोड, नाशिक येथे सर्वांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती कॉलेजरोड गंगापूर रोड वाणी मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन दहिवेलकर, अध्यक्ष संजय दुसे, विश्वस्त योगेश मालपुरे, योगेश राणे, संजय बागड, प्रविण अमृतकर, महेश पितृभक्त, राजेंद्र कोठावदे, निलेश मकर, हितेश देव, भगवंत येवला, ड. देवदत्ता जायखेडकर यांनी दिली.

स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात आत्मविश्वासाबरोबर योग्य दिशा मिळावी या उद्देशाने कॉलेजरोड गंगापूर रोड मित्र मंडळाच्या वतीने ९ वर्षांपासून 'शिक्षणविश्व' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, सायबर अवेरनेस सल्लागार ड. स्वरदा कबनूरकर, आयआयटी कॉलेजचे निवृत्त प्राचार्य प्रा. दत्तात्रय आहेर या नामवंत व्याख्यात्यांना ऐकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. जास्तीत-जास्त पालक व नवयुवकांनी लाभ घेण्याचे आवाहन प्रभाकर शेंडे, पवन बागड, हर्षद चिंचोरे, प्रशांत मोराणकर, अविनाश कोठावदे, सुधीर नावरकर, चेतन येवला, राकेश ब्राह्मणकर यांनी केले आहे.

IN THE COURT OF THE COMMISSIONER FOR WORKMEN'S COMPENSATION,
IN THE JUDGE, LABOUR COURT AT DHULE.
BEFORE DR SMT. P. P. SHINDE,
COMMISSIONER FOR WORKMEN'S COMPENSATION. APPLICATION (WCA) No. 18/2021

गोविंदा अर्जुन खैरनार ...APPLICANTS;
V/S.
हरिष भरत विभुते, रा. तिखी, ता.जि.धुळे...OPPOSITE PARTY;

**जाहिर नोटीस**

ज्या अर्थी उपरोक्त क्लेम अर्जातील अर्जदारांनी वरील सामनेवाला क्र.१ यांचे विरूध्द मे. कोर्टात, अपघातात दि.१२/०९/२०१५ रोजी अर्जदार गंभिररित्या जखमी झाल्यामुळे उपरनिर्दीष्ट मे. कामगार न्यायालयात रक्कम रू.५,००,०००/- अक्षरी रू. पाच लाख मात्र नुकसान भरपाई मिळणेसाठी मोटार वाहन कायदाल कलम १६६ व १४० नुसार अर्जदारांनी क्लेम अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाची पुढील तारीख २५/०८/२०२३ रोजी ठेवलेली आहे.

त्याअर्थी सामनेवाला क्र.१ यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी दि.२५/०८/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. उपरनिर्दीष्ट मे. कोर्टात व्यक्तीशः अगर मुख्त्यार मार्फत अगर वकिलांमार्फत हजर रहावे व सदर अर्जाबाबत आपले म्हणणे दयावे. आपण या प्रमाणे न केल्यास आपले गैरहजेरीत सदर क्लेम अर्जाचे काम एकतर्फी केले जाईल. कळावे.

आज दि.१०/०८/२०२३ रोजी आमचे वतीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी जाहिर नोटीस दिली असे.

धुळे
दिनांक:-१०/०८/२०२३ आदेशावरुन
शिक्का
**न्यायालय अधिक्षक**
**कामगार न्यायालय धुळे**

# डब्ल्यूएचओच्या चुकीच्या धोरणांचा अवेकन इंडिया मूव्हमेंटतर्फे निषेध

**करोनात गैरफायदा घेतल्याचा अभय शरद यांचा आरोप**

**नाशिक । प्रतिनिधी**



अवेकन इंडिया मूव्हमेंट (एआयएम) संघटनेतर्फे जागतिक आरोग्य संघटना तसेच जगप्रसिद्ध उद्योजक बिल गिट्स यांचा निषेध करून त्यांच्या भारतातील हस्तक्षेपाला विरोध करण्यात आला आहे. कोविड काळात नागरिकांना विनाकारण लसीकरण करून तसेच गरज नसताना औषधांचे डोस देऊन त्यांची दिशाभूल करण्यात आली, असा आरोप एआयएमचे अभय शरद यांनी पत्रकार परिषदेत केले आहेत.

नाशिक येथील रमाबाई आंबेडकर शाळेत घेतलेल्या पत्रकार परिषदेत एआयएचे अभय शरद, असिम मुन्सी, भाविका चंदनानी, श्रीकांत बुचाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी एआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, करोना काळात डब्ल्यूएचओ म्हणजेच जागतिक आरोग्य संघटनेने नागरिकांची प्रचंड प्रमाणात दिशाभूल केली होती. या महामारीच्या काळात औषधी कंपन्यांचा फायदा व्हावा म्हणून लोकांना भीतीही दाखवण्यात आली.

या संदर्भात ड. निलेश ओझा आणि दिपाली ओझा यांच्यामार्फत याचिका देखील दाखल करण्यात आली आहे. तर ७५ वर्षांपासून कार्य करणाऱ्या डब्ल्यूएचओ संघटनेचे या प्रकारातून पितळ उघडे पडले आहे. तसेच बिल गिट्स आणि मिलिंडा गिट्स यांच्या गिट्स फाउंडेशनच्या त्या काळातील घडामोडी देखील संशयास्पद ठरल्या आहेत. यापुढे त्यांना भारतात येण्यास मनाई करण्यात यावी, करोना काळात कोविड लसीकरणामुळे सुमारे १८ हजार, ५०० नागरिकांचा अचानकपणे मृत्यू झाला असा घणाघाती आरोप करण्यात आला आहे. तर याला जबाबदार कोण? असा सवाल यावेळी एआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

देशाच्या विकासाच्या दृष्टीने विविध प्रश्नांवर अवेकन इंडिया मूव्हमेंट संघटनेतर्फे देशपातळीवर जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. राऊंड टेबल संमेलन व स्वास्थ्य देखभाल विशेष तज्ज्ञांकडून जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी देखील आता सतर्क होऊन यापुढे काळजी घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## न्यूज कॉलम

### भोंनगाव शिलालेख अनावरण व ध्वजारोहण

**दहिवेल ।** उत्तमराव पाटील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तक गाव भोंनगाव येथे शिला लेखा चे अनावरण सरपंच श्री नाना मगण सोनवणे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रा शिक्षक व अंगणवाडी सेविका यांनी मातीचा कळस पूजन केले. त्यानंतर सेवानिवृत्त भारतीय सैनिक श्री दिनेश यशवंत बोरसे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी प्रभारी ग्रासेविका आर एस मुजगे,उपसरपंच मधुकर जगन्नाथ खैरनार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ योगेश कोरडे,सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा शिवप्रसाद शेवाळे व विदयार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

.................................

### बिलाडीत तरूणाची आत्महत्या

**धुळे ।** बिलाडी (ता. धुळे) येथे तरूणाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. आकाश संजय पाटील (वय २१ र बिलाडी) असे त्याचे नाव आहे. त्याने दि. १० रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घरातील किचन रूममध्ये स्कार्प रूमालाच्या सहाय्याने गळफास घेतला. त्याला नागरिकांच्या मदतीने जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करीत मृत घोषित केले. धुळे तालुका पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून तपास पोहेकाँ देवरे करीत आहेत.

# शिरपूर येथे भाजपा तर्फे आजादी का अमृत महोत्सव निमित्त हर घर तिरंगा

## बाईक रॅली उत्साहात संपन्न : आमदार अमरिशभाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती





**शिरपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी शिरपूर शहर व तालुका, भारतीय जनता युवा मोर्चा शहर व तालुका यांच्या वतीने आजादी का अमृत महोत्सव निमित्त तिरंगा बाईक रॅली शुभारंभ माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते जनक व्हीला येथून हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

शिरपूर येथे रविवार १३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आजादी का अमृत महोत्सव निमित्त तिरंगा बाईक रॅली कार्यक्रम प्रसंगी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, भाजपा प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य प्रभाकरराव चव्हाण, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तिरंगा बाईक रॅली जनक व्हीला, पाच कंदील, बालाजी मंदिर, पाटील वाडा, शिरपूर वरवाडे नगर परिषद, पित्रेश्र्वर कॉलनी, रिक्षा स्टॉप, करवंद नाका या मार्गाने काढण्यात येऊन आमदार कार्यालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी भाजपा प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य प्रभाकरराव चव्हाण यांनी भाजपच्या हर घर तिरंगा व तिरंगा बाईक रॅली बाबत मनोगत व्यक्त केले. सहभागी झालेल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल सविस्तर माहिती देऊन सर्वांनी हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. सांगवी येथे दुर्दैवी घटनेबाबत आमदार अमरिशभाई पटेल यांनी तातडीने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क करुन घटनेची कल्पना देऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. आमदार काशिराम पावरा यांच्या बाबत दंगलखोरांनी घेतलेली भूमिका व त्यांच्या वाहनाची तोडफोड केल्याबाबत तीव्र शब्दात यावेळी निषेध नोंदविण्यात आला. भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी म्हणाले, संपूर्ण देशभरात आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत भाजपा तर्फे विविध कार्यक्रम राबविण्यात येत असून नागरिकांनी मोहिमेत सहभागी व्हावे. आभार भाजयुमो तालुकाध्यक्ष आकाश मराठे यांनी मानले.

रॅली मध्ये भाजयुमो तालुकाध्यक्ष आकाश मराठे, पिळोदा उपसरपंच योगेश बोरसे, नितीन गिरासे, पंचायत समिती सदस्य यतिष सोनवणे, प्रभाकर पाटील, बाजार समिती संचालक मिलिंद पाटील, रितेश राजपूत, संदीप कुवर, मंजित पवार, नितीन पाटील, रणजीत राजपूत, नवल परदेशी, भाटपुरा उपसरपंच रोशन सोनवणे, राज सिसोदिया, अभाविप तालुकाध्यक्ष हंसराज चौधरी, विरोपाल राजपूत, राजवर्धन पवार, संदीप माळी, राहुल माळी, गजेंद्र राजपूत, निलेश पाटील कुवे, जितेंद्र सूर्यवंशी, दिपक बागुल, सौरभ राजपूत, प्रणव भदाणे, हिमांशू राजपूत, हरिष राजपूत, प्रवीण कोळी, बापू कोळी, दादू कोळी, संदीप मोरे, मनोज शेटे, अरविंद कोळी, भरत भील, मनीष मोरे, विकी थोरात, रवींद्र सोनवणे, सनी सोनवणे, भारत सोनवणे, शाबीर शहा, ऋषिकेश सोनवणे, संजय सोनवणे, अनुराग भदाणे, विक्रम मोरे, राहुल कोळी, पवन भील, राज अहिरे, पवन वाकडे , रवि भील, चेतन कोळी, बबलू राठोड, देवांश पाटील, भूपेश पावरा, गणेश पावरा, दिपक पावरा, सुजित पावरा, रमेश पावरा, विश्वास पावरा तसेच भारतीय जनता पार्टी शहर व तालुका व भारतीय जनता युवा मोर्चा शहर व तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते, स्व. तपनभाई पटेल युवा मंच मच्छी बाजार शिरपूर, युवा साम्राज्य ग्रुप शिरपूर, स्व. तपनभाई पटेल युवा मंच शिरपूर तालुका चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# चणकापूर कालव्यास वाढीव पाणी सोडा

### पालकमंत्री दादा भुसे यांना शेतकरी शिष्टमंडळाचे निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

देवळा तालुक्यातील पुर्व भागातील शेतकरी शिष्टमंडळाने चणकापूर वाढीव कालव्यास पुरपाणी सोडावे यासाठी नाशिक जिल्हाचे पालकमंत्री दादाजी भुसे यांना निवेदन दिले आहे. देवळा तालुक्यात अद्याप जोरदार पाऊस नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त व व्याकुळ झाला असून देवळा पूर्व भागातील खरीप पिके संकटात आहेत. परिस्थिती चिंताजनक निर्माण झाली असून यावर तोडगा काढावा अशी विनंती पालकमंत्री भुसे यांना शेतकऱ्यांनी केली आहे.

निवेदन दिल्यानंतर मंत्री भुसे यांनी हा विषय समजावून घेत काय तोडगा काढता येईल यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून वाढीव पाणी सोडण्याच्या सूचना दिल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी देखील निर्णय घेण्यात येईल तसेच शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असा विश्वास पालकमंत्री भुसे यांनी शेतकऱ्यांना दिला.

निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले की, चालु हंगामात पावसाळा सुरु होऊन अनेक दिवस झाले मात्र अद्यापही जोरदार पाऊस नसल्याने पेरणी केलेली खरीप पिके ढगाळ वातावरण अखेरचा श्वास घेत आहेत. तसेच पूर्व भागात जनावरांच्या चारा व पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असून चणकापुर उजवा कालवा लाभ क्षेत्रात रामेश्वर धरण भरल्यानंतर चणकापुर उजव्या कालव्यास सोडावे अशी मागणी केली असून याचा लाभ वाखारी, सुभाषनगर पिंपळगाव, खुंटेवाडी, मेशी, दहिवड, उमराणे, चिंचवे, झाडी एरंडगाव, कुंभार्डे तसेच इतर गांवाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.यावेळी निवेदन देताना देवळा तालुक्याचे प्रहार शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष संजय दहिवडकर, शेतकरी जगन्नाथ सोनवणे, माणिक देवरे, आप्पा देवरे, शांताराम बस्ते आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेनेची शाखा सामान्य माणसांसाठी आधार केंद्र व्हावे

### शिवसेना निरीक्षक हेमंत पवार यांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



शिवसेना नाशिक जिल्ह्याच्या निरीक्षकपदी ठाण्याचे हेमंत पवार यांची नियुक्ती झाली असता शिवसेना सचिव तथा उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भाऊसाहेब चौधरी व नाशिक जिल्हा निरीक्षक हेमंत पवार त्यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर - जिल्हा येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. याप्रसंगी दिंडोरी लोकसभा संपर्क प्रमुख सुनील पाटील, सह संपर्क प्रमुख चंद्रकांत लवटे, राजेंद्र सोनवणे, गणेश कदम, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, भाऊलाल तांबडे, अनिल ढिकले, महानगर प्रमुख प्रविण (बंटी) तिदमे, माजी आमदार काशिनाथ मेंगाळ, माजी आमदार पांडुरंग गांगड, लोकसभा विस्तारक योगेश बेलदार, उप जिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, दिगंबर मोगरे, श्यामकुमार साबळे, शशीकांत कोठुळे, शिवाजी भोर, प्रमोद लासुरे, महेश जोशी, अमोल सूर्यवंशी, योगेश चव्हाणके, विधानसभा प्रमुख विनायक आढाव, दिपक मौले, रोशन शिंदे, सदानंद नवले, दिगंबर नाडे, आदित्य बोरस्ते, संदेश लवटे, शिवा ताकाटे, आनंद फरताळे, उमेश चव्हाण, आदित्य सरनाईक, विक्रम कदम, योगेश म्हस्के, विशाल साळवे, अभय महादास, योगेश वाणी, भिवानंद काळे, दिलीप आहिरे, सनी रोकड, नितीन देशमुख, सुधाकर जाधव, शरदचंद्र नामपूरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना शाखा प्रमुख ते शिवसेना पक्ष निरीक्षक असलेले हेमंत पवार हे शिवसेना मुख्य नेते महाराष्ट्राचे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांबरोबरच ठाण्यात शिवसेना शाखाप्रमुख होते. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यातूनच आज आपण निरीक्षक पदापर्यंत पोहचलो. नाशिक जिल्ह्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष लक्ष असून पक्ष संघटन, पक्ष बांधणी यासंबंधी प्रामुख्याने ठाण्याच्या धर्तीवर त्यांची नाशिकवर नियुक्ती करण्यात आल्याचे सांगितले.



# मेरी मिट्टी मेरा देश अभियान अंतर्गत शीला फलक अनावरण

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

मेरी मिट्टी मेरा देश अभियान अमृत महोत्सव शीला फलक अनावरनाचा कार्यक्रम ग्रामपंचायत मौजे मैंदाणे येथे आयोजित करण्यात आला होता.

ग्रा. पं. मैंदाने ध्वजारोहण गावाचे युवासरपंच कैलास भाऊ ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. शिला फलक अनावरण संगीता गावित प.स. सदस्य मैंदाणे गण यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी वृक्ष रोपण करण्यात आलेत तसेच गावात जनजागृती रॅली काढण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित गट शिक्षण अधिकारी गवळी , ग्रामसेवक गणेश कोकणी,उपसरपंच कौशल्या बटवाडा, भारती चौरे सदस्या, भाईदास भारुडे सदस्य, सखुबाई मालचे सदस्या,गणेश गावित आदिवासी बचाव अभियान धुळे जिल्हाप्रमुख, जि. प.शाळा मैंदाणे शिक्षिका, जि. प.शाळा तांडेपाडा शिक्षक, डॉ.शामा प्रसाद मुखर्जी माध्यमिक विद्यालय मैंदाणे शिक्षक शिक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशावर्कर, ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी जि. प. शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

# दहिवेल येथे मेरी मिट्टी मेरा देश निमित्ताने ध्वजारोहण व सेवानिवृत्त सैनिकांचा सन्मान



**दहिवेल । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील दहिवेल ग्रामपंचायत येथे आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश निमित्त, ध्वजारोहन कार्यक्रम, शिलाफलक अनावरण व वीरांना वंदन तसेच पंचप्राण शपथ घेण्यात आली. आणि वंदन करण्यात आले.

यावेळी निवृत्त भारतीय सैन्यातील जवान दिनेश खैरनार यांची गावातून ओपन जीप मधून मिरवणूक काढण्यात आली घरोघरी त्यांची सव्वासींनीनी औक्षण केले अनेक ग्रामस्थांनी पुष्पहार ने स्वागत केले. यावेळी दहिवेल ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश वळवी, उपसरपंच अमोल सोनवणे, माजी उपसरपंच राजेंद्र माणिकराव पाटील, भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते वसंतराव बच्छाव, मा.उपसरपंच हिम्मतराव बच्छाव , धोंडू आनंदा पाटील, श्रावण दादा माळी, कन्हयालाल माळी, बापू उखा माळी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भानुदास गांगुर्डे, ग्रामसेवक व सर्व ग्राम पंचायत सदस्य तसेच प.स.सदस्य, गावातली प्रतिष्ठित व्यक्ती तसेच दहिवेल पोलीस दूरशेत्रचे कर्मचारी, सरकारी आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी व जि.प. मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, विध्यार्थी, विद्यार्थिनी आणि अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, तसेच गावातील सर्व जेष्ठ नागरिक व माता भगिनिनी उपस्थित राहून मोठ्या उत्साहाने कार्यक्रम पार पडला.

# साक्री तालुक्यातील बचत गट संचालकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

**साक्री । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ हे महिलांना खऱ्या अर्थाने आर्थिक दृष्ट्या संपन्न करण्यासाठी उभे केलेले प्रबळ असे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन नगरसेविका तथा जेष्ठ विधिज्ञ अँड्. पूनम काकस्ते यांनी केले. त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

शहरातील शारदा गणेश मंदिर सभागृहात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने तालुक्यातील बचत गट संचालकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साक्री नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष सौ. जयश्री पवार तर उद्घाटक जगन्नाथ वानखेडकर (जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ,धुळे) होते. मेळाव्यात साक्री तालुक्यातील बचत गटांच्या अध्यक्ष, सचिव व सदस्य मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.




अँड्. काकुस्ते म्हणाल्या की, ग्रामीण तसेच शहरी भागातील महिला ह्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून छोट्या-छोट्या बचती करून स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी छोटे छोटे व्यवसाय स्थापित करतात व त्यातून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतात. यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ हे महिलांना सक्षम करण्याचे काम करीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत खऱ्या अर्थाने कुटुंब व्यवस्थेचा आर्थिक कणा ह्या महिला आहेत. रुपयाचे नियोजन कुटुंबामध्ये कशा पद्धतीने केले पाहिजे याची सुसूत्रता महिलांच्या अंगी नैसर्गिकच आली आहे. ही जबाबदारी पार पडत असताना घरातील महिला अशिक्षित असली तरी कुटुंबाच्या सामान्य गरजेपासून कुटूंबाच्या उध्दारापर्यंत जबाबदारी अत्यंत काटेकोर पद्धतीने पार पाडत असतात. ही बाब जेव्हा १९७६ साली मोहम्मद युनूस यांना लक्षात आली तेव्हा त्यांनी महिला बचत गटाची देशात पहिल्यांदा स्थापना केली. याच बचत गटाच्या माध्यमातून आज देशांमध्ये ग्रामीण भागातील महिलांच्या हातात आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी पैसे आहेत, बँकेमध्ये स्वतःचे खाते आहे. ही बाब निश्चित देश विकसित होण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला जगातील सर्वोत्तम तीन अर्थव्यवस्थेत पोहोचवण्याचे पाहिलेले स्वप्न खऱ्या अर्थाने देशातील महिला या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाल्यात तर प्रत्यक्षात घडू शकते. लहान-मोठ्या व्यवसायाच्या माध्यमातून आपला देश हा स्वावलंबी व संपन्न होऊन विकसित होईल .याप्रसंगी महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक जगन्नाथ वानखेडेकर यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या मार्फत महिलांच्या विकासासाठी निधी वितरित होण्याची पध्दती, विविध विकास योजना या महिलांच्या उन्नतीसाठी पोचवल्या जातात याची माहिती विषद केली. याप्रसंगी आयसीआयसीआय बँकेचे सेल्स मॅनेजर संदीप बच्छाव तसेच सहायक जिल्हा समन्वयक अधिकारी मिलिंद पाटील उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर बचत गट समन्वयिका सुमन भदाणे, शारदा पिंपळसे,कोकिळा पाटील, लाशीबाई अहिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद ब्राह्मणे यांनी तर आभार प्रदर्शन दगाजी वाघ यांनी केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# पहिल्या स्वातंत्र्य दिनाचे दुर्मिळ फोटोज













धुळे
। जिल्हा १५ ऑगस्ट आणि वर्ष होतं १९४७ त्या दिवशी काय असतं स्वातंत्र्य हे अवघा भारत देश पहिल्यांदाच पाहणार होता. इंग्रजांच्या गुलामीतून आपण मुक्त होणार होतो. ही दृश्यं त्यावेळची आहेत ज्यावेळी स्वतंत्र भारताचा आनंद अनुभवण्यासाठी दिल्लीत तमाम भारतीयांनी एकच गर्दी केली होती. त्यादिवशी यत्र तत्र सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता. ज्यांना स्वातंत्र्य म्हणजे काय असतं हे देखील माहीत नव्हतं ते देखील या आनंदात सहभागी झाले होते. एरवी बेल-बॉटम परिधान करून भारतीयांवर अन्याय-अत्याचार करणाऱ्या इंग्रजांचा रुबाब त्यादिवशी पांढरा शुभ्र पायजमा-कुर्ता घालून दिल्लीत दाखल झालेल्या भारतीयांसमोर गळून पडला होता. इंडिया गेटपासून राष्ट्रपती भवनापर्यंत जाण्यासाठी एखाद्या मुंगीलाही पाय ठेवायला जागा मिळणार नाही इतकी गर्दी त्यादिवशी उसळली होती. पहिल्या स्वातंत्र्यदिनाचा कोणताही कार्यक्रम जाहीर केला गेला नसल्यानं उसळलेली गर्दी वाट फुटेल तिकडं सरकत होती. आपलं सरकार, आपली मातृभूमी काय असते याचा अनुभव घेत होती. या गर्दीवर नियंत्रण मिळवताना खाकी वर्दीच्याही नाकीनऊ आले होते. तेव्हा तर लोकांना काही सेल्फी घ्यायचा नव्हता, इन्स्टाग्रामवर व्हिडिओ अपलोड करायचा नव्हता की फेसबुकवर पोस्ट टाकून लाइक-कमेंट्सही मिळवायच्या नव्हत्या शिवाय तो ट्विटरचा जमानाही नव्हता. त्यावेळच्या भारतीयांचं कॅमेरा काय नि मोबाइल काय या दोन्हींशी दूरवरचाही संबंध नव्हता. तेव्हाची ती गर्दी फक्त स्वातंत्र्याच्या जल्लोषात दंग होती.

संकलन : पुरुषोत्तम पाटील



CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

मंगळवार, दि. १५ ऑगस्ट २०२३





# धुळ्यात १,१११ फुट तिरंगा रॅली वेधले नागरिकाचे लक्ष
















धुळे । वंदे मातरम... भारत माता की जय... या घोषणांसह डीजेवरील देशभक्तीपर गितांच्या तालावर धुळे शहरात १ हजार १११ फुट तिरंगा ध्वजाची रॅली काढण्यात आली. या रॅलीमुळे शहरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. हिंदवी स्वराज्य संघटनेचे अनुप अग्रवाल यांच्या पुढाकारातून काढण्यात आलेल्या या भव्य रॅलीने संपूर्ण धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले होते. अखंड भारत संकल्प दिनानिमित्त धुळे शहरात १ हजार १११ फुट तिरंगा रॅली काढण्यात आली. शहरातील अग्रसेन महाराज पुतळ्यापासून या रॅलीला सुरवात झाली. या रॅलीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह धुळेकर नागरिक, महिला तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी १ हजार १११ फुट तिरंगा ध्वजासह ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आग्रारोड मार्गे गांधी पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. या रॅलीदरम्यान देशक्तीपर जोरदार घोषणा देण्यात येत होत्या. तसेच डीजेवरील 'मेरी शान तिरंगा है....' यासारखी देशभक्तीपर गिते प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीची स्फूर्ती चेतवत होती. या रॅलीत खा.डॉ.सुभाष भामरे, महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा जयश्री अहिरराव, माजी महापौर प्रदीप कर्पे, हिंदवी स्वराज्य संघटनेचे अनुप अग्रवाल, उपमहापौर वैशाली वराडे, स्थायी समिती सभापती किरण कुलेवार, सभागृह नेत्या भारती माळी, महिला बाल कल्याण सभापती सारिका अग्रवाल, उपसभापती विमलबाई पाटील, मायादेवी परदेशी, कल्याणी अंपळकर, विजय पाच्छापूरकर, शितलकुमार नवले,अमोल मासुळे, सुबोध पाटील, अनिल नागमोते, भगवान गवळी, रोहित चांदोडे, विकी परदेशी, हिरामण गवळी, नरेश चौधरी, पंकज विंचू, अजय अग्रवाल, अनिल थोरात, मनोज शिरोडे, ओम खंडेलवाल, बापू खलाणे, राकेश कुलेवार, भिकन वराडे, बबन चौधरी, अमोल सूर्यवंशी, मोहन टकले, हर्षकुमार रेलन, रमेश करनकाळ, किशोर थोरात, किरण चौधरी आदी मान्यवरांसह सर्व पक्षीय पदाधिकारी तसेच शाळकरी विद्यार्थी- विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

संकलन : दिपक वाघ